# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

लोकमत

# राजगुरुनगरचं सांस्कृतिक वैभव : साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

**देशाच्या स्वातंत्र्यासाठी आत्मबलिदान देणारे थोर क्रांतिकारक हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचं जन्मगाव म्हणजे खेड राजगुरुनगर. हुतात्मा राजगुरुंच्या प्रेरणादायी जीवनकायार्मुळे राजगुरुनगरला एक क्रांतिकारी ओळख मिळाली, तर हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या रुपाने शैक्षणिक ओळख मिळाली आहे. आता नव्याने राजगुरुनगरची सांस्कृतिक ओळख साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेच्या रुपाने बनू लागली आहे.**

सामान्य माणसाच्या जीवनात शिक्षणरुपी ज्ञानदीप लावण्यासाठी साहेबरावजी बुट्टेपाटील यांनी १९७७ साली हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाची स्थापना केली आणि हजारो भाग्यवंत विद्यार्थ्यांचे आयुष्य त्या शिक्षणाच्या तेजाने उजळून निघाले. ३ जानेवारी २००१ रोजी त्यांचे दु:खद निधन झाले. माजी आमदार साहेबरावजी बुट्टेपाटील यांनी घालून दिलेला आचार, विचार आणि मूल्यांचे संवर्धन व्हावे आणि त्यातून पुढील पिढी घडावी, या उद्देशाने खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेचे दि. २७ जानेवारी ते २ फेब्रुवारीदरम्यान आयोजन करण्यात येते. व्याख्यानमालेचे हे १९वे वर्ष आहे.

खरे तर महाराष्ट्राला संत आणि समाजसुधारकांनी केलेल्या प्रबोधनाची उज्ज्वल परंपरा आहे. मध्ययुगीन कालखंडात या प्रबोधनाचे स्वरुप आध्यात्मिक होते. पुढे ब्रिटिशांच्या आगमनाने आलेल्या इंग्रजी शिक्षणाने या प्रबोधानाचे स्वरुप सामाजिक व धार्मिक झाले. परिणामी आधुनिक विचारांची घुसळण होऊन समाजजीवनात वैचारिक संक्रमण सुरु झाले. या

**उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे**

संक्रमावस्थेतील संभ्रमित झालेल्या समाजाला मार्गदर्शनाच्या गरजेतून व्याखानमाला हे लोकविद्यापीठ स्थापन झाले आहे. या प्रबोधनाच्या पीठिकेत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळानेही खारीचा वाटा उचलताना व्याख्यानमाला संस्कृती रुजवली आहे. वक्ता आणि श्रोता यांचा हृदय संवाद घडविणे, भूतकाळाचे विश्लेषण करताना वर्तमानकाळ समजून घेणे आणि भविष्याचा वेध घेताना त्याचे नेमके सूचन करण्याचे काम साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला करीत आहे. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना समाजात यशस्वी झालेल्या व्यक्तिमत्त्वांच्या प्रत्यक्षानुभवाचा आनंद मिळतो आहे. सलग सात दिवस दर्जेदार व्याख्यानाची मेजवानी देणाऱ्या या व्याखानमालेने उत्तर पुणे जिल्ह्यातील सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक जीवनात स्वतंत्र असे स्थान निर्माण केले आहे.

उत्तम आयोजनाचा नमुना असणारी ही व्याख्यानमाला सकाळी बरोबर दहा वाजता सुरु होते. व्यासपीठावर फक्त वक्ता आणि समोर सात-आठ हजार विद्यार्थी श्रोते हे या व्याख्यानमालेचे ठळक वैशिष्ट्य.

Prof. Pravin Aghav
Director
(B.A., B.Ed., M.A., M.Phil)
Cell : 9604777827

Mrs. Archana Aghav
Principal
B.A., D.Ed.,(English Med)
B.A.(Marathi Med)
Cell : 7841051312
Office : 9604818519

श्री एस.पी.आघाव पाटील शिक्षण संस्था संचालित...
"विश्वशांतीनिकेतन" विद्यालय
(Semi English Medium, CBSE Board School)
• शिशु गट • लहान गट • मोठा गट
• Play Group • Nursery • Jr.Kg • Sr.Kg

संतोष ऑल-राऊंडर ॲकॅडमी™
International Affiliation : Japan,
IAMA Taiwan, Malaysia & Singapore
Abacus | Smart Handwriting Above 4 years | Phonics | Rubic Cubes | DMIT Brain Test No Age Limit
Spoken English | Vedic Maths Above 15 years | Yoga Classes | Day Care Center | English Grammar Above 8 Years

वर्धापन दिन आणि नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा
MKCL ने नावाजलेले चाकण शहरातील
MSCIT चे अधिकृत प्रशिक्षण केंद्र
BRIGHT

लोकमत

गेल्या १८ वर्षात डॉ . रघुनाथ माशेलकर, डॉ. विजय भटकर, पंडित हृदयनाथ मंगेशकर, अभिनेता विक्रम गोखले, सुधीर गाडगीळ, हणमंतराव गायकवाड, ॲड. उज्ज्वल निकम, डॉ. बालाजी तांबे, माजी निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण, संपादक गिरीश कुबेर, भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाचे माजी सचिव ज्ञानेश्वर मुळे, ह.भ.प. निवृत्तीमहाराज देशमुख यासारख्या आत्यंतिक प्रतिष्ठित आणि सर्वांना आदरस्थानी असणाऱ्या अनेक वक्त्यांनी या व्याख्यानमालेची उंची आणि लौकिकात वाढ केली आहे. महाविद्यालयीन जीवनात समाजाच्या विविध क्षेत्रांत मोठी झालेली माणसं अगदी जवळून अनुभवायला मिळणे, हे तसे भाग्यच. या माणसांची विचारसरणी, त्यांची प्रेरणा, प्रभाव, जडणघडण समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनात अनुभवायला मिळणे त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने खूप आवश्यक असते. विद्यार्थीही लक्षपूर्वक व्याख्याने ऐकतात. महत्त्वाच्या मुद्द्यांची टिपणे काढतात. त्यावर चर्चा करतात. वक्त्यांशी संवाद साधून प्रश्न विचारतात. यामधून विद्यार्थ्यांनाही वेगळे, नवे, वेगळ्या वाटेने काही करण्याची प्रेरणा मिळत असते. यातून संवेदनशील श्रोते घडतात. त्यामुळे चांगले कानसेन तयार होण्यास मदत झाली आहे. महाविद्यालयात या व्याख्यानांवर 'मला आवडलेला वक्ता' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन केले जाते. महाविद्यालयाने राबविलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांत विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होताना दिसू लागले आहेत. मोबाईल, चित्रपट, दूरचित्रवाणीमुळे जगण्याला वेग आला असताना या व्याख्यानमालांचे भवितव्य काय? असा प्रश्न निर्माण होणे साहजिकच आहे

लोकमत

साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेला श्रोत्यांच्या मिळणाऱ्या भरभरुन प्रतिसादामुळे ही व्याख्यानमाला भरात असल्याचे दिसणारे चित्र मनाला आश्वासक दिलासा देणारे आहे. महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थी उत्सुकतेने या व्याख्यानमालेची वाट पाहतात; ही गोष्ट आयोजक म्हणून खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरीभाऊशेठ सांडभोर व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना सुखावणारी आहे. अशा प्रकारचा विचारांचा जागर, शब्दोत्सव समाजात त्याच निष्ठेने चालविण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेच्या आयोजकांनी ही व्याख्यानमाला अशीच उत्तरोत्तर पुढे नेली पाहिजे, अशी भावना विद्यार्थी सातत्याने व्यक्त करतात, ही आनंदाची गोष्ट आहे. राजगुरुनगरच्या सांस्कृतिक वैभवात या व्याख्यानमालेने नक्कीच भर घातली आहे. असे मला वाटते.

Hello Pune Gramin
Page No. 11 Jan 02, 2020
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख